खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने घेतांना ३% शुल्क आकारण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.- संकीर्ण-०२/२०१८/प्र.क्र.२९/अ-२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. २३ मार्च, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय क्र.संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दि.१२.५.२०१५
२) शासन परिपत्रक क्र.एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२,दि.२५.०१.२०१७ व शासन शुद्धीपत्रक,दि.२७.११.२०१७

प्रस्तावना:-

खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय, दि.१२.५.२०१५ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. थेट खरेदी पद्धतीने जमीन ताब्यात घेण्याबाबतच्या शासन धोरणास अनुसरून शासन परिपत्रक ,दि.२५.०१.२०१७ व दि.२७.११.२०१७ नुसार कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार थेट खरेदी पद्धतीने जमिनी ताब्यात घेतांना महसूल यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना विविध टप्प्यावर कामकाज करावे लागत असते ,याप्रमाणे महसुली यंत्रणा ही जमीन ताब्यात घेण्याच्या कार्यवाहीसाठी कार्यरत राहते .महसुली अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वरील कामकाज विचारात घेता त्याच्यासाठी लागणाऱ्या कार्यालयीन खर्चासाठी रक्कम उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे.

तसेच नवीन भूसंपादन कायदा, २०१३ मधील कलम३ (i)(vi) येथील आस्थापना शुल्काबाबत दिलेल्या संज्ञेनुसार शासन अधिसूचना,दि.१९.०३.२०१४ अन्वये ३% आस्थापना शुल्क व ३% सोईसुविधा शुल्क हे लागू करण्यात आलेले आहेत.

सद्यस्थितीत, जिल्हाधिकारी ,रायगड-अलिबाग व वाशिम तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने घेतांना आस्थापना शुल्क व सोईसुविधा शुल्क आकारण्याबाबत मार्गदर्शनार्थ विचारणा करण्यात आली होती त्यानुषंगाने खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने घेतांना आस्थापना शुल्क व सोईसुविधा शुल्क लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने घेतांना २%आस्थापना शुल्क व १% सोईसुविधा शुल्क असे एकूण ३% शुल्क आकारण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक क्र २०१८०३२७१३५००८३८१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Narayan Pimpale

Digitally signed by Rajendra Narayan Pimpale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2035e3a0bddb0bf614404e90ab41bc73e05b7120d9a7b3314f072bc7a31fca9c, cn=Rajendra Narayan Pimpale
Date: 2018.03.27 13:51:41 +05'30'

(राजेंद्र ना.पिंपळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३) मा.मंत्री (महसूल (यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री(वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री (जलसंपदा) खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८) सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९) अ.मु.स. (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) प्रादेशिक अधिकारी, मुंबई, महाराष्ट्र,भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई
१८) प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर प्रादेशिक कार्यालय, नागपूर
१९) महाव्यवस्थापक (भूमि व सर्व्हेक्षण), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या.,मुंबई.
२०) संचालक, नगर रचना, पुणे
२१) सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंपदा विभाग)
२२) निवडनस्ती (अ-२).